# महाराष्ट्र शासन

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

## संताजी जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर

## जाहीर सूचना

### मुलांच्या शासकीय वसतिगृहासाठी इमारत भाड्याने घेण्याबाबत

संताजी जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रध्दानंदपेठ नागपूर येथे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी **100 मुलांची क्षमता असलेले शासकीय वसतिगृह सुरू करण्याकरिता नागपूर शहर/परिसरात योग्य, सुरक्षित व सर्व आवश्यक सोयी-सुविधांनी युक्त इमारत भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहे.**

इच्छुक इमारत मालकांनी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून आपले प्रस्ताव सादर करावेत.

**1. इमारतीबाबत आवश्यक अटी**

1. इमारत वसतिगृहाच्या वापरासाठी योग्य, सुरक्षित, सुस्थितीत व राहण्यायोग्य असावी.
2. इमारत **100 विद्यार्थ्यांच्या निवासासाठी पुरेशी** असावी.
3. इमारतीमध्ये विद्यार्थ्यांसाठी निवास खोल्या, स्वयंपाकघर, भोजनगृह, अभ्यासासाठी जागा, कार्यालयीन जागा, स्नानगृहे व स्वच्छतागृहे इत्यादी आवश्यक सुविधा उपलब्ध असाव्यात.
4. इमारतीमध्ये पुरेसा व सुरक्षित **पाणीपुरवठा, वीजपुरवठा, प्रकाश व वायुवीजनाची व्यवस्था** असावी.
5. इमारतीमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य प्रवेशद्वार, जिने, रेलिंग व इतर आवश्यक सुरक्षा व्यवस्था असावी.
6. आवश्यकतेनुसार **अग्निसुरक्षा व्यवस्था/अग्निशमन प्रमाणपत्र** उपलब्ध करून देणे इमारत मालकास बंधनकारक राहील.
7. इमारत वसतिगृहासाठी वापरण्यास कोणतीही कायदेशीर/स्थानिक प्राधिकरणाची अडचण नसावी.
8. इमारतीचे **इमारत स्थैर्य प्रमाणपत्र (Structural Stability Certificate)** सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त असणे आवश्यक राहील किंवा मागणी केल्यास मालकाने ते उपलब्ध करून द्यावे.
9. इमारतीचा परिसर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य असावा व शक्यतो संस्थेपासून सोयीच्या अंतरावर असावा.
10. इमारत स्वतंत्र वापरासाठी उपलब्ध करून देण्यास मालकाची संपूर्ण तयारी असावी.

**2. मालकी हक्क व कागदपत्रे**

इच्छुक मालकांनी प्रस्तावासोबत खालील कागदपत्रांच्या स्वाक्षरीत प्रती सादर कराव्यात :-

- इमारतीच्या मालकी हक्काचा पुरावा/खरेदीखत/मालमत्ता पत्रक इत्यादी.
- मालमत्ता कर भरल्याची अद्ययावत पावती.
- मंजूर बांधकाम नकाशा/बांधकाम परवानगी, लागू असल्यास.
- इमारत वापरासंबंधी आवश्यक परवानगी/प्रमाणपत्र.
- Structural Stability Certificate.
- Fire Safety Certificate/NOC, लागू असल्यास.
- पाणी व वीज जोडणीचा पुरावा.
- इमारतीचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ व वापरण्यायोग्य क्षेत्रफळाचा तपशील.
- मालकाचा आधार/पॅन इत्यादी आवश्यक ओळख पुरावा.
- संयुक्त मालकी असल्यास सर्व मालकांची संमती.

**3. भाडे व मूल्यांकन**

1. इमारतीचे भाडे **संबंधित शासकीय नियम व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेनुसार** निश्चित करण्यात येईल.
2. इमारतीचे भाडे मूल्यांकन आवश्यकतेनुसार **सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD)** अथवा शासनाने नियुक्त **केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत** करण्यात येईल.
3. मालकाने मागणी केलेले भाडे आणि शासकीय मूल्यांकनानुसार निश्चित होणारे भाडे यामध्ये फरक असल्यास **शासकीय मूल्यांकन/मान्यतेनुसार निश्चित होणारे भाडेच ग्राह्य राहील.**
4. भाडे, अनामत रक्कम, कर, वीज, पाणी, देखभाल व इतर खर्च याबाबतची जबाबदारी अंतिम भाडेकरारामध्ये निश्चित करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

५. भाडेकरार सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच करण्यात येईल.

४. इमारत पाहणी व निवड

1. प्राप्त प्रस्तावांमधील इमारतींची प्रत्यक्ष पाहणी संबंधित समिती/अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येईल.
2. इमारतीची क्षमता, क्षेत्रफळ, स्थान, सुविधा, सुरक्षितता, बांधकामाची स्थिती, भाडे व शासकीय निकषांची पूर्तता या बाबींचा विचार करून योग्य इमारतीची निवड करण्यात येईल.
3. प्रस्ताव सादर केल्याने इमारत भाड्याने घेण्याचा कोणताही हक्क निर्माण होणार नाही.
4. कोणताही किंवा सर्व प्रस्ताव कारण न देता स्वीकारणे अथवा नाकारणे तसेच प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.
5. निवड झालेल्या इमारतीची आवश्यक त्या शासकीय विभागामार्फत तांत्रिक/भाडे मूल्यांकन तपासणी करण्यात येईल.

५. प्रस्ताव सादर करण्याची पद्धत

इच्छुक इमारत मालकांनी **"मुलांच्या शासकीय वसतिगृहासाठी इमारत भाड्याने देण्याबाबत प्रस्ताव"** असा स्पष्ट उल्लेख करून बंद लिफाफ्यात प्रस्ताव सादर करावा.

प्रस्तावामध्ये खालील माहिती असावी :-

- इमारत मालकाचे पूर्ण नाव व पत्ता
- मोबाईल क्रमांक
- इमारतीचा संपूर्ण पत्ता
- एकूण बांधकाम क्षेत्रफळ
- वापरण्यायोग्य क्षेत्रफळ
- उपलब्ध खोल्यांची संख्या व आकार
- उपलब्ध स्वच्छतागृहे/स्नानगृहांची संख्या
- स्वयंपाकघर व भोजनगृहाची माहिती
- पाणी व वीज सुविधेचा तपशील
- अग्निसुरक्षा सुविधेचा तपशील
- इमारतीचे अपेक्षित मासिक भाडे
- इतर उपलब्ध सुविधा

**6. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख**

प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख : 02/09/2026

वेळ : सकाळी 11.00 वाजेपर्यंत

प्रस्ताव सादर करण्याचे ठिकाण :

उपसंचालक,

संताजी जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,

नागपूर.

संपर्क क्रमांक : 9960080219 (श्री.एम.व्ही.देवघरे)

ई-मेल : iti.nagpur@dvet.gov.in

दिनांक : 14/08/2026

ठिकाण : नागपूर

1) M.V. deoghare [signature]
2) A. R. Kene [signature]
3) S.L. Dhamne [signature]
4) J.V. Talahule [signature]
5) S.P chavhan [signature]

[signature]

उपसंचालक,

संताजी जगनाडे महाराज

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर

Scanned with OKEN Scanner

## महाराष्ट्र शासन

## जाहीरात सूचना

संताजी जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रध्दानंदपेठ नागपूर येथे मुलांच्या शासकीय वसतिगृहासाठी 100 विद्यार्थी क्षमतेची योग्य इमारत भाडेतत्वावर घेण्यात येणार आहे.

इमारत भाड्याने घेण्यासंदर्भातील सर्व अटी व शर्ती, आवश्यक कागदपत्रे, प्रस्तावाचा नमुना व इतर सविस्तर माहिती संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

संकेतस्थळ : www.itinagpur.co.in

संपर्क क्रमांक : 9960080219 (श्री.एम.व्ही.देवघरे)

सौ.एस.एस.कुलकर्णी
उपसंचालक
संताजी जगनाडे महाराज
शास.औ.प्रशि.संस्था नागपूर

1) M.V. deoghare —
2) A.A. Kene —
3) S.L. Dhumne —
4) J.V. Talahule -
5) S.P. chavhan

Scanned with OKEN Scanner